
# गरुड झेप

www.janatabankpune.com

अंक ४ था - सन २०१४ (जनता सहकारी बँक लि., पुणे मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खाजगी वितरणासाठी)


## अध्यक्षांचे लेखणीतून,



*या आर्थिक वर्षापैकी निम्मा कालावधी पूर्ण झाला आहे. आत्तापर्यंत काय केले, पुढे काय करता येईल याबाबतचे विचार मंथन नुकत्याच झालेल्या शाखाव्यवस्थापक परिषदेत केले गेले. मार्च २०१५ साठी ठेवलेली उद्दीष्टे अजूनही खूप दूर वाटतील, पण गती वाढवून नक्कीच सहजसाध्य होतील. परिक्षा आल्यावर अभ्यास करून पास होणाऱ्या विद्यार्थ्यापेक्षा वर्षभर अभ्यास करून परिक्षा पास होण्याबरोबरच ज्ञानार्जन करणारा विद्यार्थी हा आयुष्यात नक्कीच यशस्वी होतो. त्याप्रमाणे तात्पुरत्या प्रयत्नांऐवजी सततचे प्रयत्न नुसतीच उद्दिष्टे साध्य करण्याबरोबरच बँकेला सक्षम ठेवायला उपयोगी व गरजेची असतात. शस्त्राची धार कमी होवू नये म्हणून ते वापरात ठेवणे आवश्यक असते, तसेच बुध्दी व शरीराला गंज/मांद्य येवू नये म्हणून ज्ञानाची व प्रयत्नांची कास सोडून चालत नाही. आर्थिक परिस्थिती वेगाने बदलत आहे. बदल हे आमूलाग्र स्वरूपाचे दिसून येत आहेत. उदा. जुन्या प्रकारच्या क्लिअरींगची जागा आता सीटीएस घेत आहे. त्यावेळी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट मधील तरतुदी बदलण्याची आवश्यकता भासते अशा दूरगामी परिणाम करणा-या बदलांना आपल्याला सतत सामोरे जावे लागत आहे. बँकिंग रेग्युलेशन ॲक्टमध्ये मोठे बदल करण्याचे दृष्टीने सरकारची तयारी चालू आहे. याचा गंभीर व मोठा परिणाम आपल्या व्यवसायावर होवू शकतो. अशा वेळी ग्राहक टिकवूनठेवणे हे मोठे आव्हान आहे. त्यासाठी सेवक वर्ग हा सजग व नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करायला तत्पर असावा लागतो. हया गोष्टी आपल्याकडे नक्कीच आहेत. परंतु मनाला भीती, मरगळ यांचा स्पर्श नसावा. कृती नेहमी सकारात्मक ठेवावी. नकारात्मक विचारांना थारा देऊ नये. जीवनाच्या विविध अंगांना, गरजांना स्पर्श करणारी तंत्रज्ञाने सतत बदलतात. त्यांच्या नवनवीन आवृत्त्या येतात. बदलत्या दुचाकी, चार चाकी, मोबाईल फोन, पेहरावातील बदल ही त्याची रोजच्या वापरातील उदाहरणे आहेत. या बदलांबरोबर आपल्याला बदलावेच लागते. स्थितीप्रियतेऐवजी नाविन्याची ओढ हवी. दीपावली शुभपर्व नुकतेच आनंदात पार पडले. आता नव संवत् नववर्ष सुरू झाले अशा वेळी आपण असा निर्धार करूया की, अथक प्रयत्नात आपण मागे पडणार नाही व नक्कीच यशस्वी होवू. आपल्या प्रयत्नांना हार्दीक शुभेच्छा! आपणास व आपल्या कुटुंबीयांना हे नववर्ष सुख समृध्दी भरभराटीचे जावो ही कामना!*

**-अरविंद खळदकर**

# ६५वा वर्धापनदिन उत्साहात संपन्न!




सहकार क्षेत्रामध्ये आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्याने आणि त्यातल्या त्यात बँकिंग क्षेत्रात स्वत:चे स्वतंत्र असे स्थान निर्माण करणाऱ्या आपल्या बँकेने नुकताच ६५वा वर्धापनदिन मोठ्या दिमाखात आणि उत्साहात साजरा केला. एका अर्थाने बँकेच्या विचारांची, तत्त्वांची जपणूक करतांना सर्वसामान्य जनतेला सहकार्याचा मदतीचा हात देण्याची भूमिका आणि रा. स्व. संघाच्या मुशीमध्ये संस्कारीत झालेल्या असंख्य स्वयंसेवकांच्या व कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून आपली बँक उभी आहे. संस्कारीत विचारांचा वारसा आणि राष्ट्रवादाची भूमिका प्रथमपासूनच डोळ्यासमोर ठेवून काम करणाऱ्या बँकेचा आज वटवृक्ष झालेला पहावयास मिळत आहे. पारंपारिकतेचा आणि आधुनिकतेचा सुरेल संगम बँकेने आपल्या कार्यातून घडवून आणला. प्रसंगी कितीही संकटे उभी राहिली तरीही त्यातून वाट काढण्याची भूमिका अंगीकारल्यानेच बँकेचा विस्तार आज मोठ्या प्रमाणावर झालेला दिसतो. केवळ पुण्यामध्येच नव्हे तर राज्याच्या अनेकविध भागांत आपल्या शाखांनी सेवाभावी वृत्ती जपल्याचे हे द्योतक आहे असेच म्हणावे लागेल.

आपल्या बँकेचा ६५वा वर्धापनदिन आणि कै. मोरोपंत पिंगळे स्मृती जनता बँक पुरस्कार प्रदान सोहळा नुकताच गणेश कला क्रीडा मंच येथे पार पडला. कोल्हापूर जिल्ह्यातल्या कणेरी येथील श्रीक्षेत्र सिद्धगिरी संस्थेला आणि ज्येष्ठ समाजसेवक व मुस्लिम सत्यशोधकचे कार्यकर्ते मा. सय्यदभाई यांच्या कार्याचा गौरव पुरस्कार प्रदान करून करण्यात आला. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंदराव खळदकर लिखीत 'नवल वर्तले' या पुस्तकाचे प्रकाशन समारंभपूर्वक करण्यात आले. बँकेचा ६५ वर्षाचा चालता बोलता इतिहास आणि बँकेच्या वाटचालीचा लेखा जोखा वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या पुस्तकाने केला आहे. एकता प्रकाशनने या पुस्तकाचे प्रकाशन केले आहे.

**पान क्र. ३ वर**

# आपल्या बँकेच्या विविध शाखांमध्ये संपन्न झालेल्या शिक्षकदिनासंबंधीचे वृत्त

## बाणेर शाखा

आपल्या बाणेर शाखेने शिक्षकदिनाचे औचित्य साधून शिक्षकदिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ऑर्चीड स्कूल, एम.टी.बालवडकर स्कूल व NICMAR संस्था, लर्निंग कर्व्ह स्कूल . या शाळांमध्ये जावून शिक्षकांचा सत्कार केला व त्यांना नवीन अकाऊंट उघडणे बाबत आवाहन व मार्गदर्शन करण्यात आले.

## शिवाजीनगर पुणे शाखा

पी.इ. सोसायटीच्या मॉडर्न गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापिका, सौ. शोभा शिवाजी निकम यांना ५ सप्टेंबर, २०१४ या शिक्षकदिनाच्या दिवशी भारताचे मा. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यानिमित्त शिवाजीनगर, पुणे शाखेतर्फे त्यांचा देवी सरस्वतीची मूर्ती तसेच पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी बँकेचे मा. उपाध्यक्ष श्री. संजय लेले, मा. संचालक श्री. बिरू खोमणे तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. व. शां. कुलकर्णी हे आवर्जून उपस्थित होते. बँकेच्या वतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सौ. शोभा निकम यांचे अभिनंदन केले. या सर्व कार्यक्रमाचे सूत्र संचालन सेवक श्री. स्वानंद बर्वे यांनी केले तर शाखा व्यवस्थापक श्री. अतुल क्षीरसागर यांनी आभार व्यक्त केले.

## पावस शाखा

स्वामी स्वरूपानंद मंदिरचे मुख्याध्यापक श्री अशोक कामत यांचा सत्कार शाखाव्यवस्थापक श्री. संदीप गानू यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच बँकेच्या एकूण व्यवसायाची, नवीन उपक्रमची माहिती श्री गिरीष काळे यांनी करून दिली.

## कडवई शाखा

५ सप्टेंबर शिक्षकदिनानिमित्त अभियानांतर्गत बँकेच्या कडवई शाखेमार्फत भाईशा घोसाळकर हायस्कूल, महाराष्ट्र उर्दू हायस्कूल, अे. बी. देवरुखकर विद्यालय, तुरळ आणि अन्य शाळांमध्ये भेट देऊन शिक्षकांशी संवाद साधण्यात आला. शाखेमार्फत सर्व शिक्षकांना शुभेच्छा देण्यात आल्या. महाराष्ट्र उर्दू हायस्कूल कडवई मधील श्री. कादरी सर यांनी सांगता करतांना शिक्षकांच्या नि:स्पृह कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त केल्याबद्दल मन:पूर्वक आभार मानले. तुरळ हायस्कूल मधील शिक्षक श्री. पाटील सर यांनी या कार्यक्रमाविषयी आनंद व्यक्त केला.या प्रसंगी शाखा व्यवस्थापक श्री. अर्जुन वडतिले यांनी बँकेच्या प्रगतीविषयी तसेच चिरंजीव व सुकुमार बचत ठेव योजनांची माहिती सांगितली.

## पौडरोड शाखा

शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पौड रोड शाखेतील शाखा व्यवस्थापक श्री. मांडके व कर्मचारी यांनी प्रिझम फौंडेशन या गतिमंद व मतिमंद मुलांसाठी काम करणाऱ्या संस्थेची कृतज्ञतापूर्ण सदिच्छा भेट घेतली. संस्थेतील शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पद्मजा गोडबोले यांनी सर्वांचे स्वागत करून पूर्ण संस्थेच्या व शाळेच्या कार्याची माहिती दिली. शिक्षकांचे प्रमाणिक प्रयत्न, जिद्द, पाहून सगळे भारावून गेले व संस्थापकांचे, शिक्षकांचे मन:पूर्वक कौतुक केले.

## माखजन शाखा

५ सप्टेंबर २०१४ रोजी शिक्षकदिनानिमित्त शाखेतर्फे शाखाव्यवस्थापक श्री. श्रीनिवास गरवारे व सेवक श्री. अनंत शिगवण यांनी सरंद गावातील माखजन इंग्लिश स्कूल व अॅड. पी. आर. नामजोशी कॉलेज या ठिकाणी भेट दिली. तद्नंतर शाखेपासून १२ कि.मी. अंतरावरील माध्यमिक विद्यालय करजूवे येथील शाळेमध्ये शिक्षक दिन कार्यक्रम संपन्न झाला.

## बाजीराव रोड शाखा, पुणे

सामाजिक बांधिलकीचे नाते आपली बँक नेहमीच जोपासत आहे. या सामाजिक बांधिलकीच्या भावनेने 'शिक्षक दिना' निमित्त बाजीराव रोड शाखेच्या वतीने बँकेच्या परिसरातील दहा शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. विशेष बाब म्हणजे रेणुका स्वरुप शाळेमध्ये मा. आमदार गिरीष बापट साहेब कार्यक्रमास उपस्थित होते. या उपक्रमात मा. सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. कुंभार साहेब तसेच अन्य सेवकांनी श्री. खांडजकर, श्री. खरे, श्री. ढमाले, श्री. कदम, सौ. थत्ते व श्रीमती एकबोटे यांनी सहभाग घेतला. या शाळांव्यतिरिक्त अन्य दोन शाळांचे शाखेत खाते नसतांनाही त्या शाळेतील शिक्षक व सेवकांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

अशा रितीने 'शिक्षक दिनाचा कार्यक्रम' शाखेतर्फे उत्कृष्टरित्या साजरा केला गेला.

## कर्वेरोड शाखा, पुणे

कर्वेरोड शाखेमध्ये शिक्षकदिनानिमित्त शाखेशी संबंधित शाळा व अन्य शाळेतील सर्व शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.

शाखाव्यवस्थापक श्री. जितेंद्र रावेतकर तसेच सहाय्यक शाखाव्यवस्थापक श्री. सतिश कुर्डुकर यांनी रामचंद्र राठी हायस्कूल, विमलाबाई गरवारे माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये भेट दिली. शाखाव्यवस्थापकांनी बँकेबाबत माहिती दिली. याशिवाय अन्य सात शाळांमध्ये सेवक श्री. कुलकर्णी व लोढा यांनी जाऊन सर्व शिक्षक व शिक्षिका यांना बँकेच्या वतीने शुभेच्छा दिल्या.





**पान क्र. १ वरुन :**

याप्रसंगी ज्येष्ठ उद्योगपती श्री. अभय फिरोदिया, ज्येष्ठ पत्रकार श्री. विजय कुवळेकर, अध्यक्ष श्री. अरविंदराव खळदकर, उपाध्यक्ष श्री. संजय लेले, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंतराव कुलकर्णी व सर्व संचालक व्यासपीठावर उपस्थित होते. 'नवल वर्तले' या पुस्तकाला दैनिक लोकसत्ताचे संपादक डॉ. गिरीश कुबेर यांची प्रस्तावना लाभली आहे.

या कार्यक्रमात उद्योगपती श्री. अभय फिरोदिया यांच्या हस्ते इंटरनेट बँकिंग सुविधा आणि बोधचिन्हाचे अनावरण ही करण्यात आले. तसेच बँकेच्या परंपरेनुसार यंदाही कृतज्ञता निधी सामाजिक संस्थांना प्रदान करण्यात आला. इंटरनॅशनल लेप्रसी युनियन हेल्थ अलायन्स, सुराज्य सर्वांगीण विकास प्रकल्प, निरामय, श्री संत सेवासंघ आणि कै. उषाताई लोखंडे चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थांचा यामध्ये समावेश आहे. प्रत्येकी एक लाख रुपये, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप होते.

वर्धापनदिनानिमित्त बँकेने परिपूर्ण अशी इंटरनेट बँकिंग सेवा सुरू केली असून आता अत्याधुनिक बँकिंग तंत्रज्ञानात आपण कुठेही मागे नाही.

श्री. फिरोदिया यांनी स्पष्ट केले की, नागरी बँकांच्या मालमत्ता हक्कांची पायमल्ली होत गेल्यानेच वित्तीय संस्था अडचणीत आल्या आहेत यावर गांभिर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण बँकांमुळेच देशाच्या विकासाला, प्रगतीला हातभार लागतो या वास्तवतेकडे दुर्लक्ष करता येणार नाही. तर मा. सय्यदभाई यांनी पुरस्काराविषयी कृतज्ञता व्यक्त केली




आणि पुरस्काराची रक्कम राष्ट्रीय एकात्मता कार्यक्रमाला देण्याचे जाहीर केले. ज्येष्ठ पत्रकार श्री. कुवळेकर यांचे समायोचित भाषण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ अभिनेते श्री. राहुल सोलापूरकर यांनी आपल्या खुमासदार शैलीत केले. संस्कार भारतीच्या पूनम पत्की यांनी लक्ष्मीस्तवन व पसायदान सादर केले. उपाध्यक्ष श्री. संजय लेले यांनी वर्धापनदिनाच्या कार्यक्रमामागची भूमिका विषद केली. संचालक श्री. सुधीर पंडित यांनी आभार मानले.

### पुस्तकाबाबत थोडेसे....
## नवल वर्तले

जनता सहकारी बँकेच्या
ऐतिहासिक यशोगाथेची दुसरी गोष्ट...
सहकार क्षेत्रातील एखादी बँक
तोट्यात गेली की बहुतेक बुडतेच
असा आजवरचा अनुभव असताना;
१२५ कोटींचा संचित तोटा भरून
काढून सभासदांना लाभांश देण्याइतपत
घसघशीत नफा मिळविणारी सुस्थिती
प्राप्त करण्याची आश्चर्यवत कामगिरी
पुण्याच्या जनता सहकारी बँकेने करून
इतिहास घडविला आहे.
सहकार क्षेत्रात हे आश्चर्य कसे घडले?
त्या संघर्षपूर्ण वाटचालीतील अवहेलना,
मानापमान, धाडसी निर्णय,
कठोर कार्यवाही, ग्राहकांची निष्ठा,
सभासदांचा अतूट विश्वास,
सेवकांची खंबीर साथ
या विषयी बँकेचे कार्याध्यक्ष
श्री. अरविंद खळदकर यांनी केलेले
अनुभवनिष्ठ, प्रांजळ कथन...


**भावपूर्ण श्रद्धांजली**

## आपल्या बँकेच्या संचालिका सौ. भाग्यश्री चितळे यांचे निधन



**पुणे :** आपल्या बँकेच्या विद्यमान संचालिका सौ. भाग्यश्री सुरेश चितळे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ६२ वर्षांच्या होत्या. त्यांच्यामागे पती, एक मुलगा, सून, एक मुलगी, जावई व नातवंडे आहेत. बँकेच्या त्या गेली दहा वर्षे संचालिका होत्या. सरस्वती महिला पतसंस्थेच्या त्या संस्थापक संचालिका होत्या. राष्ट्र सेविका समितीच्या कार्यकर्त्या असलेल्या सौ. चितळे या मेघालयातील विद्यार्थीनींसाठीच्या वसतिगृहाचे देखील काम पाहत होत्या. सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## बँकेचे माजी अध्यक्ष वि. श्री. दामले यांचे निधन




**पुणे :** आपल्या बँकेचे माजी कार्याध्यक्ष व ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ विद्याधर श्रीधर दामले यांचे नुकतेच निधन झाले. १९९७ मध्ये ते आपल्या बँकेचे कार्याध्यक्ष होते. तर २००७ ते २०१२ पर्यंत ते अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. कै. दामले हे युनायटेड वेस्टर्न बँकेचे सुमारे १३ वर्ष अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यापूर्वी ते राजपत्रित अधिकारी म्हणून महाराष्ट्र शासनाच्या सेवेत होते. इंडियन बँक असोसिएशनचे मानस सचिव, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे व्यवस्थापन समिती सदस्य व सल्लागार म्हणून देखिल त्यांनी काम पाहिले होते. १९९३ पासून त्यांचा विविध सामाजिक संस्थांशी संबंध होता. त्यांनी बँकिंग, सहकार, व्यवस्थापन आदि विषयांमध्ये विपूल लेखन केले आहे. आपल्या बँकेच्या प्रगती व वाटचालीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## कर्जविषयक सविस्तर माहितीचे अभ्यासपूर्ण पुस्तक

**ओळख पुस्तकांशी**

श्री. प्रकाश कोंडपल्ले हे आपल्या बँकेच्या प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांच्याकडे बँकिंग विषयक कामाचा ४० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. यात कर्ज विषयक कामे व प्रशिक्षण या क्षेत्रात २० पेक्षा जास्त वर्षे काम त्यांनी केले आहे. आपल्या बँकेच्या प्रशिक्षण केंद्राद्वारे महाराष्ट्रभर पसरलेल्या अनेक छोट्या मध्यम आकाराच्या सहकारी बँकांतील कर्मचारी अधिकारी संचालक यांच्यासाठी अनेकविध विषयांवर प्रशिक्षण वर्गांचे त्यांनी आयोजन केले आहे. आपल्या बँकेतील सेवकांच्या व इतर बँकांतील सेवकांच्या प्रशिक्षण विषयक काय गरजा आहेत याची त्यांना निश्चित जाण आहे. कर्ज विषयक कामे यात कर्जदाराच्या निवडी पासून ते कर्ज खाते पूर्ण वसुली पर्यंत विविध पायऱ्यांवर काय व कोणती कामे अभिप्रेत आहेत. ती कशी करावयाची त्याप्रकारे का करावयाची याचे विश्लेषण ते आपल्या प्रशिक्षण वर्गात अत्यंत सोप्या भाषेत करत असतात. हे सर्व ज्ञान व माहिती एकत्रित स्वरूपात व लिखीत स्वरूपात उपलब्ध व्हावी यासाठी त्यांना विनंती केली गेली त्याचे फलित म्हणजे श्री. कोंडपल्ले यांनी लिहिलेले ''फंडामेंटल्स ऑफ क्रेडीट फॉर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स'' हे पुस्तक होय.

बँकेची महत्वाची कामे दोन. एक म्हणजे ठेवी स्वीकारणे व दुसरे म्हणजे कर्ज देणे. यातील दुसऱ्या कामासंबंधी अर्बन को ऑपरेटीव्ह बँकांच्या दृष्टीने सर्वांग परिपूर्ण माहिती देणारे हे पुस्तक आहे. अत्यंत सोप्या व ओघवत्या भाषेत हे पुस्तक आहे. सर्व सामान्य कर्मचाऱ्याला समजेल व जे या प्रकारचे काम करतात त्यांना वेळोवेळी संदर्भासाठी उपयोगी पडेल अशी त्याची रचना आहे. बँकेच्या रोजच्या कामकाजात उपयोगी पडावे, संदर्भासाठी उपयोगी होईल, बँकेतील प्रमोशनची परिक्षा वा मुलाखत असेल त्यावेळी अभ्यासासाठी उपयुक्त वाटेल, एखाद्या ठिकाणी प्रशिक्षण कार्यक्रम घेताना त्यात काय विषय अंतर्भूत करावेत त्या विषयी व्याख्यान देताना कोणत्या मुद्यांचा परामर्ष घ्यावा यासाठी सुद्धा हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. थोडक्यात बँकेत नव्याने रुजु झालेल्या तसेच अनुभवी कर्मचारी, अधिकारी, परिक्षार्थी, व्याख्याते, बँकांचे संचालक या सर्वांना उपयोगी असे हे पुस्तक आहे.




केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर भारतभर पसरलेल्या अनेक छोट्या मोठ्या सहकारी बँका व पतपेढ्या यांच्याशी संबंधिताना याचा उपयोग व्हावा म्हणून हे पुस्तक इंग्रजीत लिहिले गेले आहे.

बँकिंग व प्रशिक्षण यातील आपल्या प्रदीर्घ व विविधांगी अनुभवांचा परिपोष श्री. कोंडपल्ले यांनी या लिखाणातून केला आहे. बहुउपयोगी व माहितीने परिपूर्ण असे हे पुस्तक आहे.

या १४५ पानी इंग्रजी भाषेतील पुस्तकात एकूण ११ प्रकरणांचा समावेश आहे. त्यामध्ये : १. बँकिंग सिनारिओ २. अप्रेरायझल ऑफ व लोन प्रपोजल ३. ॲसेसमेंट ऑफ टर्म लोन लिमिट ४. असेसमेंट ऑफ वर्किंग कॅपिटल लिमीट ५. सँक्शन डॉक्युमेंटेशन ॲण्ड डिसबर्समेंट ऑफ लोन ६. नॉन फंड बेस्ड लोन्स ७. रिटेल लोन्स ८. कन्सॉर्शियम ऑफ लोन्स ९. मॉनिटरिंग ऑफ लोन्स १०. नॉन परफॉर्मिंग लोन्स ११. ॲब्रीव्हीएशन. याखेरीज बँकिंग क्षेत्राचा इतिहास, बँकिंग क्षेत्राचे बदलते स्वरुप आणि सध्याच्या काळात या क्षेत्रासमोरील आव्हाने तसेच प्रशिक्षणाची गरज याविषयावरही लेखकाने प्रकाश टाकला आहे. याखेरीज काही उदाहरणासहित आवश्यक त्या बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंदराव खळदकर यांचा शुभसंदेश या पुस्तकाला लाभला आहे. पुस्तकाची किंमत रु. १६०/- असून, ते राज्य सहकारी संघाने ते प्रकाशित केले आहे.

# वीरमाता मीनादेवी यांचा आपल्या बँकेतर्फे सन्मान




**वीरमाता मीनादेवी यांचा सन्मान करतांना बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर. सोबत हेमराज यांचे बंधू व संचालक श्री. सुधीर पंडित.**

**पुणे** : क्रांतीदिनाचे औचित्य साधून बँकेतर्फे वीर जवान शहीद हेमराज यांच्या मातु:श्री मीनादेवी यांचा सन्मान करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष मा. श्री अरविंद खळदकरसाहेब यांच्या हस्ते रोख रूपये ५१ हजार, साडी-चोळी व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. शहीद हेमराज यांच्या बंधूंचा ही सन्मान मा. संचालक श्री सुधीर पंडित यांनी केला.

पूँछ बॉर्डरवर ८ जानेवारी २०१३ रोजी लान्सनायक हेमराज यांचे शीर पाकिस्तानी अतिरेक्यांनी कापून नेले होते. पुण्यातील सैनिक मित्रपरिवाराच्या अशोक मेंहदळे व आनंद सराफ यांनी हेमराज यांच्या कुटुंबीयांना पुण्यातील सामाजिक संस्थांच्या भेटीला आणले होते. यावेळी आपल्या बँकेचे संचालक श्री. सुनील मुतालिक, श्री. लक्ष्मण पवार, सौ. मधुरा कसबेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी, पूना पीपल्स बँकेचे संचालक ॲड. श्री. सुभाष मोहिते, तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## तळेगांव स्टेशन शाखेमध्ये श्री सत्यनारायण महापूजा संपन्न

तळेगाव स्टेशन शाखेमध्ये श्रावणमासानिमित्त सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले. पूजा अत्यंत प्रसन्न वातावरणात पार पडली. श्री. मिलींद वाडेकर हे सपत्निक पूजेला बसले होते. मॅक्स जनरल इन्श्युरन्सचे प्रतिनिधीही यावेळी उपस्थित होते. यानिमित्ताने तळेगांवातील सर्व मान्यवर खातेदारांना निमंत्रित करण्यात आले. आवर्जून निमंत्रण वाटप केल्याने ६५० निमंत्रीत येऊन गेले. यात अनेक कंपन्यांचे कामगार प्रतिनिधी, तळेगांवचे नगराध्यक्ष मा. श्री गणेश खांडगे, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अनेक कर्मचारी, एस.टी.महामंडळाचे सेवक व कामगार प्रतिनिधी बी.एस.एन.एल.चे कर्मचारी आणि विशेष म्हणजे आपल्याकडे खाती असलेल्या सर्व पतसंस्था त्यांचे सदस्यही उपस्थित होते.

एक टीमवर्क या उद्देशाने झालेला कार्यक्रम सेवकांना आणखी काम करण्यासाठी उत्साहवर्धक ठरला.

## शिवाजीनगर शाखेतील कर्मचाऱ्यांसाठी ‘कम्युनिकेशन स्कील’ कार्यक्रम

शिवाजीनगर शाखेत कर्मचाऱ्यांसाठी ‘‘संवादाची कौशल्ये’’ या विषयावर संवादात्मक कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात श्री. सुधाकर घोडेकर (निवृत्त अधिकारी बँक ऑफ महाराष्ट्र) यांनी मार्गदर्शन केले.

श्री. घोडेकर यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून खातेदाराची भावना आपण कशाप्रकारे जाणून घ्यावी व योग्य संवाद कसा करावा? याबाबत अनेक उदाहरणे देऊन स्पष्टीकरण दिले. योग्य व अर्थपूर्ण संवाद, ग्राहकांच्या उपस्थितीची दखल, कामातील नेटकेपणा, चूक झाल्यास खुलेपणाने स्वीकारण्याची मानसिकता इ. मुद्यांबाबत सविस्तरपणे माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिकारी श्री. प्रफुल्ल कुलकर्णी यांनी केले व आभार प्रदर्शन शाखा व्यवस्थापक श्री. अतुल क्षीरसागर यांनी केले.

## साखरपा शाखेचे विविधवृत्त

* आपल्या साखरपा शाखेतील खातेदार, सभासद श्री. संदिप दत्तात्रय कांबळे यांना जिल्हापरिषद रत्नागिरी तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे.

* शाखेतील खातेदार,सभासद श्री. यशवंत एकनाथ वैद्य यांची कन्या चि. अश्विनी हिला शालांत माध्यमिक परिक्षेत ९१.४०% गुण मिळाले आहेत.

**या दोघांचेही बँकेतर्फे हार्दिक अभिनंदन!**

* शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी साखरपा पंचक्रोशी मधील सर्व शाळांना भेटी देवून सर्व गुरूजनांना शाखेतर्फे गौरविण्यात आले.

# Cyber Crime

In the previous issue we discussed about basic details of Cyber Crime. In this issue we will discuss about some of the types of Cyber Crimes.

**Financial Crimes :-**

Common motive behind most of the crimes is money. It is observed that cyber crimes are being committed for financial motives. Financial cyber crimes include credit / debit card frauds, bank server / bank account frauds, hacking etc. With increase in the use of internet and mobile banking, online share trading, this trend is likely to increase tremendously.

In credit card / debit card frauds victim's card information is stolen / misused for making online transactions. The suspect would install keyloggers in computers most commonly used at public places such as cyber cafes, airport, malls etc.

Unknowingly victims would use these computers to make online transactions. Card information would be emailed to the suspect.

At point of sale terminals installed at petrol pumps attendants, hotel waiters etc. may note down information related to credit / debit cards used for making payment. This information is sold to criminals who misuse it for frauds.

**Cyber Pornography :-**

Cyber pornography is one of the largest business on the internet. The millions of pornographic websites are growing rapidly in the cyberspace. In many countries pornography is not illegal however child pornography is strictly prohibited in the most of the nations. Cyber pornography includes websites, magazines produced using computers and or internet. Most of the pornographic websites are hosted on servers located in the countries where pornography is not illegal or prohibited Information Technology Act – 2000 provisions related to cyber pornography are




Section 67 – publishing or transmitting obscene material in electronic form;

Section 67A - publishing or transmitting of material containing sexually explicit act in electronic form;

Section 67B – publishing or transmitting of material depicting children in sexually explicit act in electronic form All the offences related to pornography are Cognizable and non bailable.

**Sale of Illegal Articles :-**

Illegal articles include narcotic drugs, weapons etc. Publishing or transmitting information about the sale or availability of such type of products is illegal. The suspect posts information through an email ID using fictitious details. If buyer and seller trust each other after their conversation and / or communication actual transaction takes place. In such cases the buyer and seller will meet face to face at the time of transaction.

It is very very difficult to control or prevent such type of criminals from transacting in illegal articles. Illegal financial gain is the main motive behind these types of transactions.

**Online Gambling :-**

There are many websites that offer online gambling. Online gambling is legalized in few countries. The owners of these websites are safe in their countries. Legal issue arises when Indian citizen gambles on such a website.

**Intellectual Property Crimes :-**

Software piracy, music piracy, source code theft etc. are included in intellectual property crimes. Selling and buying of pirated software, music album, movie is a criminal offence. Pirated software, music, movie downloading in electronic form through websites, newsgroups, emails etc. is illegal. Mostly pirate sells pirated software, music albums, movies in physical media like CDs. Pirate uses high speed CD duplication equipments to create copies.

We will discuss other details of cyber crimes in the next issue.

**Ashish Naware**
**– IT Department**

# कंपनी कायदा १९५६ मधील दुरुस्त्या – सुधारित कंपनी कायदा २०१३

आपल्या देशामध्ये विविध प्रकारच्या प्रायव्हेट लिमिटेड, लिमिटेड कंपन्यांचे तसेच एलएलपी (Limited Liability Partnership) कामकाज हे कंपनी कायदा १९५६ नुसार चालते. हा कायदा करताना त्यावेळी असलेली परिस्थिती, तंत्रज्ञान याचा विचार करून कायदा तयार केला गेला. आज २१ व्या शतकात या कायद्यात काही दुरुस्त्या करणे क्रमप्राप्त ठरलेहोते, या सर्वाचा सारासार विचार करून तसेच नव्याने विकसित झालेल्या तंत्रज्ञानाचा विचार करून सन २०१३ मध्ये भारत सरकाने कंपनी कायदा १९५६ मध्ये काही बदल सुचवले काही दुरुस्त्या केल्या आहेत

बँकिंग व्यवसाय करताना एका बँकरला माहिती असावेत असे कंपनी कायद्यात केलेले महत्वाचे बदल, दुरुस्त्या पुढीलप्रमाणे :

१. नवीन कंपनी कायद्यातील तरतुदी या १/०४/२०१४ पासून अंमलात येतील.

२. या पूर्वी कंपनी स्थापन करताना किमान २ संचालक आवश्यक होते. सन २०१३ मधील दुरुस्तीनुसार आता १ व्यक्तीही कंपनी स्थापन करू शकते.

३. कंपनी कायदा १९५६ मध्ये बँकांचा कर्जाचा चार्ज नोंदवण्याबाबत प्लेज स्वरुपात दिलेल्या कर्जाचा चार्ज नोंदवण्याची आवश्यकता नव्हती. कंपनीच्या कामकाजामध्ये अधिक पारदर्शकता यावी कंपनी बरोबर व्यवहार करताना कंपनीने कोणता माल अथवा सिक्युरिटी प्लेज स्वरुपात दिली आहे हे कळण्यासाठी आता प्लेज लोन स्वरूपातील कर्जाचाही चार्ज नोंदवणे आवश्यक केलेले आहे. असा चार्ज नोंदवण्यासाठी बँकांना त्यांच्या प्लेज अग्रीमेंट मध्ये आवश्यक ते बदल करून घ्यावे लागतील.

४. कंपनीने बँकेकडे तारण दिलेल्या सर्व प्रकारच्या मुव्हेबल आणि इमुव्हेबल मालमत्तेवर चार्ज नोंदवणे आवश्यक राहील.

५. एल एल पी च्या बाबतही फॉर्म ८ नुसार चार्ज नोंदवणे आवश्यक आहे.

६. कंपनी कायद्यानुसार बँकेला ३०० दिवसात चार्ज नोंदवण्यास परवानगी आहे मात्र ३० दिवसात चार्ज नोंदणी केल्यास नाममात्र शुल्क देवून चार्ज रजिस्टर करता येतो, ३० दिवसानंतर चार्ज नोंदवण्यासाठी अधिक शुल्क भरावे लागेल.

७. कॉर्पोरेट गॅरंटी द्यावयाची असल्यास होल्डिंग कंपनीची कॉर्पोरेट गॅरंटी घेता येईल होल्डिंग कंपनीची सबसिडरी कंपनी ही आपल्या होल्डिंग कंपनीस कॉर्पोरेट गॅरंटी देवू शकणार नाही.

८. शेअर अप्लिकेशन मनी या हेड खाली असलेली रक्कम ही जास्तीतजास्त ६० दिवस त्या हेड मध्ये ठेवता येईल त्यानंतर या रकमेचा योग्य तो जमाखर्च केला गेला पाहिजे.

या व्यतिरिक्त बँकर च्या दृष्टीने आवश्यक बाबीची ढोबळ मानाने माहिती पुढीलप्रमाणे

● आरओसी कडे दोन प्रकारे चार्ज नोंदवला जातो. १. फ्लोटिंग चार्ज २. फिक्सड् चार्ज. – व्यवसायातील करंट ॲसेट म्हणजे स्टॉक बुक डेट इत्यादीवर फ्लोटिंग चार्ज नोंदवला जातो तर व्यवसायातील फिक्स ॲसेटवर फिक्सड् चार्ज नोंदवला जातो.

● कंपनीच्या कर्जास कंपनीचे संचालक अथवा थर्ड पार्टी ची मिळकत तारण असली तरी बँकेने आरओसी कडे त्याचा चार्ज नोंदवावा कारण आरओसी चार्ज हे पब्लिक डॉक्युमेंट असल्याने कंपनीने कोणत्या सिक्युरीटी वर कोणाच्या सिक्युरीटी वर किती कर्ज घेतले आहे हे अन्य बँका अथवा संस्थांना कळते आणि त्यानुसार अन्य संस्था त्या कंपनी बरोबर व्यवहार करावा किंवा नाही याचा निर्णय घेवू शकतात.

● कॅश क्रेडीट स्वरूपाच्या कर्जामध्ये नूतनीकरण असले तरी केवळ व्याजदरात बदल असेल तर पुन्हा आरओसी कडे चार्ज नोंदवण्याची गरज नाही मात्र अन्य कोणताही बदल असेल तर उदा. मार्जिन रक्कम, मुदत अन्य अटी इत्यादी मध्ये बदल असेल तर मात्र पुन्हा चार्ज नोंदवणे (Modificcation of Charge) करणे आवश्यक आहे.

● अन्य कोणत्याही ठिकाणी चार्ज नोंदवला असेल तरी आरओसी कडे चार्ज नोंदवणे आवश्यक आहे. उदा. मॉर्गेज करताना सेरसाई कडे किंवा रजिस्ट्रार कडे चार्ज नोंदवला असेल तरी आरओसी कडे चार्ज नोंदवणे आवश्यक आहे.

● कंपनीला कर्ज दिलेले असल्यास कंपनीच्या ताळेबंदात आपल्या बँकेचे नांवाचा स्पष्ट उल्लेख आहे याची ही बँकेने खात्री करावी.

वरील माहिती ही साधारणपणे कंपन्यांशी बँकेने व्यवहार करताना काय काळजी घ्यावी यासाठी ढोबळ मानाने दिलेली असून या साठी अधिक दक्षता म्हणून बँकेचे आरओसी कन्सल्टंट यांचा सल्ला घ्यावा.

**ज. पु. कश्यप**
शाखा व्यवस्थापक
(बाजीराव रोड शाखा)

## वर्धापन दिनाच्या शुभेच्छा !

**जनता सहकारी बँक लि., पुणे – दि. १८ ऑक्टोबर**

✻ बाजीराव रोड, ..............दि. १८ ऑक्टोबर १९४९

✻ कोल्हापूर शाखा ............दि. २९ ऑक्टोबर १९७९

✻ कर्वेरोड .....................दि. १० नोव्हेंबर १९६३

✻ दादर ........................दि. २१ डिसेंबर १९७२

✻ ओतूर.......................दि. ७ डिसेंबर १९८४



## जनता बँक गणेशोत्सव... उत्साहात संपन्न!



आपल्या सेवक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष श्री. अभय ढमाले व सर्व कार्यकारिणीने विशेष परिश्रम घेतले. सजावट आनंद ताडला व त्यांचे सहकाऱ्यांनी केली. सर्वांचे अभिनंदन!

## डॉ. रामदास गुजराथी यांचा बोरिवली येथे जाहीर सत्कार

बोरिवली, मुंबई परिसरात गेली तीन दशके ज्ञानदानाचा यज्ञ अव्याहतपणे चालू ठेवणाऱ्या या ख्यातकीर्त प्राचार्य डॉ. रामदास गुजराथी यांचा दि. १६ ऑक्टोबर २०१४ रोजी जाहीर सत्कार समारंभ संपन्न झाला. सदर कार्यक्रमास खा. गोपाळ शेट्टी, आ. विनोद घोसाळकर, गोखले एज्युकेशन सोसायटीचे प्रा. श्री. पंडित, बोरिवली एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. विनुभाई वालिया, अ.भा. नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री. प्रदिप कबरे आदि मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शाखा व्यवस्थापक श्री. रवींद्र लिमये यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले व आपल्या बँकेची माहिती उपस्थितांना दिली.

## सिध्देश जानवे याचे फुटबॉल स्पर्धेत यश

बँकेचे सेवक श्री. राजेंद्र जानवे यांचा मुलगा चि. सिध्देश याने फुटबॉल स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त करून दुसरा क्रमांक पटकवला आहे. इंटरनॅशनल स्पोर्टस् फिएस्टा २०१४ या स्पर्धेत त्याने ही कामगिरी केली आहे.

हार्दिक अभिनंदन!

## अ.भा. निवृत्त रेल्वे कर्मचारी फेडरेशनचा मेळावा संपन्न

अ.भा. निवृत्त रेल्वे कर्मचारी फेडरेशनच्या बोरिवली शाखेच्या वतीने घेण्यात आलेल्या मेळाव्यास शाखा व्यवस्थापक श्री. रवींद्र लिमये हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शाखेचे खातेदार श्री. अरविंद दिघे यांनी आपल्या बँकेला ही संधी उपलब्ध करून दिली. यावेळी श्री. लिमये यांनी आपल्या बँकेची माहिती दिली व उपस्थितांनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून सहकारी बँकिंग बाबत माहिती करून घेतली. या मेळाव्यामुळे सदर फेडरेशनच्या सुमारे ४०० सभासदांची खाती आपल्या बँकेत उघडण्यास मदत होणार आहे.

## Think and Act

* *

**A person fails because either he only thinks and does not act or he acts without thinking.**

* *

**Medicines cure body. Positive thoughts cures mind. Medicines have expiry date. Positive thought does not expire.**

## कोल्हापूर शाखेमधील (CASA) ठेव संकलनासाठीच्या प्रयत्नांचा वृत्तांत

कोल्हापूर शाखेकडून (CASA) ठेव संकलनासाठी विविध प्रकारे प्रयत्न करण्यात आले आहेत. शाळा अथवा महाविद्यालयांमध्ये एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांना मिळणारे विद्यावेतन बँकेतील त्या विद्यार्थ्यांच्या बचत ठेव खात्यामध्येच जमा करणेबाबत शासनाने अध्यादेश काढला असून त्यासंदर्भात शाखाव्यवस्थापकांनी अनेक महाविद्यालयांमध्ये जाऊन संबंधित शिक्षकांची भेट घेऊन त्यांना बँकेची व बँकेच्या योजनांची माहिती दिली व बँकेत खाते उघडण्याविषयी आवाहन केले. प्रयत्नांती एकूण २५० खाती शाखेने मिळवली आहेत. बँकेने नव्याने सादर केलेली सुकुमार बचत ठेव योजना व सध्या असलेली चिरंजीव बचत ठेव योजना शाखेच्या खातेदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी शाळांशी संपर्क केले आहेत. सध्या विनाअनुदानित असलेल्या पण नव्याने अनुदानित म्हणून मान्यता मिळालेल्या शाळांची खाती मिळण्यासाठी शाखेचे प्रयत्न सुरू आहेत. त्यातून दोन नवीन शाळांची चालू ठेव खाती शाखेस मिळाली असून, त्यांच्या कर्मचाऱ्यांची वीस वेतन खाती शाखेस मिळाली आहेत.

या योजनेसाठी प्रयत्नशील असलेल्या सेवकांचे कार्य कौतुकास्पद आहे.

# एज्युफ्लेक्स कर्ज योजनेसाठी कोल्हापूर शाखेचा मेळावा




बँकेच्या जनता एज्युफ्लेक्स कर्ज योजनेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीस माहिती प्रचारासाठी मेळाव्याचे आयोजन केले. संचालक सुधीर पंडित यांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन मेळाव्याला सुरुवात झाली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही. एस. कुलकर्णी, उपमहाव्यवस्थापक श्रीराम आपटे, शाखाव्यवस्थापक विनय दुनाखे उपस्थित होते. मा. संचालक श्री. पंडित यांनी सांगितले की, प्रत्येक विद्यार्थ्यांला शिक्षणाची आस असते; पण पैशांअभावी त्यांच्या शिक्षणाला ब्रेक लागतो. बँकेने सुरू केलेली ही योजना नक्कीच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी फायदेशीर ठरणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणीत बँक पाठीशी राहील.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुलकर्णी यांनी सांगितले की, बँकेने अनेक योजना सुरू केल्या आहेत. त्यापैकी जनता एज्युफ्लेक्स योजना आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत बँकेने विद्यार्थ्यांसाठी ही योजना सुरू केली आहे. प्रास्ताविकात शाखा व्यवस्थापक व सहा. महाव्यवस्थापक श्री दुनाखे यांनी योजनेची कर्ज रक्कम, कर्ज मुदत, जामीनदार, तारण, व्याजदर, मुदत, परतफेड यांची सविस्तर माहिती दिली.

नियोजन विभागाचे उपमहाव्यवस्थापक श्री. आपटे यांनी सांगितले की, बँकेने २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात १०,००० कोटींपेक्षा अधिक व्यवसाय केला आहे. बँकेच्या एकूण ४६ शाखा आहेत. ३४ एटीएम आणि १३ मेगाबँकरद्वारा ग्राहकांना २४ तास सेवा मिळत आहे. बँकेने तंत्रज्ञानावर आधारित मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, डाटा सेंटर शेअरिंग सेवा सुरू केली आहे. ग्राहकांना तत्पर व पारदर्शक बँकिंग सेवा देण्यात बँक कटिबध्द राहील.

यावेळी उद्योजक सर्वश्री दिनेश बुधले, नितीन वाडीकर, पद्माकर सप्रे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी पालक -विद्यार्थी उपस्थित होते. उदय कुलकर्णी यांनी आभार मानले.

---

## भवानी पेठ शाखेने राबविले लो कॉस्ट डिपॉझीट अभियान

शाखेच्या लो कॉस्ट डिपॉझिट वाढीसाठी भवानी पेठ शाखेने जुलै महिनाभर हे अभियान राबविले. यासाठी संपूर्ण पूर्वतयारी केली होती. त्यानुसार जुने व नवीन नियुक्त ट्रेनी लेखनिक, शिपाई, सेवकांचा त्यात समावेश होता. त्यानुसार शक्तीगट, भक्तीगट, साधनागट, पूर्ततागट योजले. प्रत्येक गटात ४ सेवक अशी रचना केली.प्रामुख्याने परिसरातील सर्व पेठा, त्यातील व्यापारी वर्ग, शाळेतील शिक्षक, विडीकामगार, हौ. सोसायट्या, पतसंस्थांमधील सेवक, छोट्या उद्योग करणाऱ्या फर्मस्मधील कर्मचारी, चिरंजीव ठेवींसाठी शाळांमधील विद्यार्थी इ. शी मोठ्या प्रमाणात संपर्क केला.

## बँकिंग परिक्षेमधील यशाचे मानकरी.... अभिनंदन !

**JAIIB**

१. श्री. राजीव गोपाळराव सोनुने - वरिष्ठ अधिकारी, जालना रोड शाखा

२. श्री. शेखर प्रभाकर जोशी - कनिष्ठ अधिकारी, सीआयसीडी विभाग

## माहे ऑगस्ट - सप्टेंबर २०१४ मध्ये निवृत्त झालेले सेवक

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शरदचंद्र कृ. आगाशे | सेवा विभाग | कनिष्ठ अधिकारी |
| २. | श्री. कमलाकर ना. अनगळ | बाजीराव रोड | कनिष्ठ अधिकारी |
| ३. | श्री. राजीव र. चोरघे | फोर्ट | लेखनिक |
| ४. | श्री. रविउदय य. घोसाळकर | देवरुख | लेखनिक |

**पुढील आयुष्यात आपल्याला उदंड सौख्य व निरामय दीर्घायुष्य लाभो!!**

## ग्राहकसेवेची पातळी उंचावण्यासाठी कोल्हापूर शाखेची प्रयत्नशीलता

कोल्हापूर शाखेने ग्राहकसेवेचा दर्जा वाढविण्यासाठी काही चार्टर्ड अकाऊंटंटस्‌बरोबर मिटींग आयोजित केली होती. कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने बँकेची व शाखेची आर्थिक माहिती व विविध प्रॉडक्टस्‌ची माहिती शाखाव्यवस्थापक यांनी दिली.

त्यानंतर मोकळेपणाने झालेल्या चर्चेत उपस्थित चार्टर्ड अकौंटंट यांनी उद्योजकांकडील अकौंटस्‌चे काम करणाऱ्या सेवकांचा प्रशिक्षण वर्ग बँकेने आयोजित करावा, चार्टर्ड अकौंटंटची सोसायटी त्यासाठी सहकार्य करेल, कर्ज विषयक निर्णय प्रक्रियेत तत्परता यावी म्हणून शाखाव्यवस्थापक यांना योग्य ते प्रशिक्षण द्यावे व मुख्यकचेरी स्तरावर गतिमान निर्णय मिळण्याची व्यवस्था करावी अशा काही चांगल्या सूचना केल्या. समारोप मा. संचालक श्री. सुधीर पंडित साहेब यांनी केला.

## जालना रोड, औरंगाबाद शाखेचा वर्धापनदिन उत्साहात संपन्न

जालना रोड औरंगाबाद शाखेचा प्रथम वर्धापनदिन दि. १९ ऑगस्ट २०१४ रोजी साजरा झाला. या निमित्त शाखेमध्ये सत्यनारायण महापूजेचे आयोजन केले होते. सत्यनारायण महाप्रसादाला शाखेतील व शहरातील बँकेचे सभासद, खातेदार, नागरिक, हितचिंतक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सेवकांचा अत्यंत सक्रीय सहभाग होता.

## मेंदीस्पर्धेत फर्ग्युसन रोड शाखेच्या महिला कर्मचारी विजयी

गणेशोत्सवानिमित्त मेंदी व रांगोळी स्पर्धांचे आयोजन केले होते. यावेळी बँकेच्या गणेशोत्सव मंडळाने मेंदी स्पर्धेत फर्ग्युसन शाखेच्या महिला कर्मचारी कु. स्वाती रविंद्र जगताप यांना प्रथम क्रमांक आणि सौ. पद्मजा प्र. पैनारकर यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. त्यांचे बँक परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

# देणे समाजाचे.... कृतज्ञता सार्वजनिक विश्वस्त निधी




आपल्या बँकेचे एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागाकडे व्यवस्थापनासाठी असलेल्या कृतज्ञता सार्वजनिक विश्वस्त निधीने महाराष्ट्रातील गारपीटग्रस्त व आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या परिवाराच्या मदतीसाठी काही रक्कम जमविली होती. या रकमेपैकी रु. १०००००/- मात्र रक्कम यापूर्वीच तर रूपये ५१०००/- रक्कमेचा धनादेश नुकताच निधीचे अध्यक्ष श्री. अच्युतराव पाटणकर यांचे हस्ते जनकल्याण समिती, रा. स्व. संघाकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी प्रास्ताविकामध्ये निधीचे अध्यक्ष श्री. पाटणकर यांनी निधीच्या कार्याचा तपशील तसेच निधीच्या विश्वस्तांची ओळख करून दिली.

मदत स्वीकारल्यानंतर समितीचे सचिवांनी निधीचे विश्वस्तांचे आभार मानले.

या प्रसंगी कृतज्ञता सार्वजनिक विश्वस्त निधीचे विश्वस्त श्री. शरद घाटपांडे, श्री दयानंद ठाकूर, श्री. श. पु. भावे, आपल्या बँकेचे अधिकारी तसेच समितीचे श्री. शरद खाडीलकर व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## चिंचवडगांव शाखेमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधांचा प्रारंभ

आपल्या चिंचवडगांव शाखेत ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र पासबुक काऊंटर, ठेव काऊंटर व टेलर काऊंटर सुरू केले असून त्यामुळे शाखेत येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना तत्परतेने व वेगाने बँकिंग सेवा मिळत आहे. सदर सुविधा चालू केल्याबद्दल आपले खातेदार श्री. सतीश चांदवणकर यांनी पत्राद्वारे समाधान व आभार व्यक्त केले आहेत. त्याचप्रमाणे बँकेचे जुने खातेदार श्री. आर. आर. बेलसरे यांनी बँकेकडून उत्कृष्ट ग्राहकसेवा मिळत असल्याचा आनंद व्यक्त केला. बँकेचे खातेदारांशी सकारात्मक व मैत्रीपूर्ण संबंध असल्याचे व्यक्त केले.

## विपन्नावस्थेतील कलाकारासाठी आपल्या बँकेने केले सहकार्य



संगीतकार स्व. हेमंतकुमार, महेंद्र कपूर यांना एकेकाळी पेटीची साथ केलेले एक कलाकार श्री. केशवलाल गुजराथी हे गेले ३५ वर्षे पुण्यात रहात असून त्यांचे वास्तव्य पुण्याच्या निरनिराळ्या फूटपाथवर व्यतीत करीत होते. अशा एका जुन्या कलाकाराला पुण्यातील स्वयंसेवी कार्यकर्ते श्री. आनंद सराफ यांच्या पुढाकाराने व पुण्यातील १५ गणेशोत्सव मंडळांच्या सहकार्याने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत, वारजे येथे आपल्या बँकेच्या मोलाच्या मदतीमुळे हक्काचे घर मिळाले आहे. हिराबाग मंडळाने श्री. केशवलाल यांना आर्थिक मदत देण्यासाठी त्यांचा एक छोटा पेटीवादनाचा कार्यक्रम केला व त्या कार्यक्रमात जमलेल्या मंडळांनी सुमारे २०,०००/- रु. चा निधी गोळा केला. नंतर पुण्याचे प्रसिद्ध गायक श्री. जितेंद्र भुरूक यांनी त्यांच्या स्वत:च्या वाद्यवृंदामध्ये श्री. केशवलाल यांचा कार्यक्रम सादर केला. सदर कार्यक्रमात सुमारे ७०,०००/- रु. चा निधी जमा झाला. एका बांधकाम व्यावसायिकाने सुमारे रु. ५०,०००/- ची मदत केली. असे जमा झालेले पैसे कोठे ठेवायचे हा प्रश्न निर्माण झाला असतांना आपल्या बँकेने तो सोडविला. बँकेच्या शनिवार-नारायण पेठ शाखेचे त्यावेळचे शाखाव्यवस्थापक श्री. विवेक जोशी यांनी श्री. केशवलाल यांचे खाते आवश्यक ती काळजी घेवून उघडून घेतले. व त्यांचे पैसे सुरक्षित ठेवून वेळोवेळी घरासाठी लागणारे ड्राफ्ट काढून दिले. त्यामुळे आज श्री. केशवलाल गुजराथी हे त्यांच्या हक्काच्या घरात रहायला गेले.

## बोरिवली शाखेमध्ये श्री सत्यनारायण महापूजा संपन्न

शाखेच्या प्रथम वर्धापन दिनाचे औचित्य साधून ''श्री सत्यनारायण महापूजेचे'' आयोजन करण्यात आले. या दिवशी ५० बचत व १ चालू ठेव खाते उघडण्यात आले, तसेच रु. १० कोटींनी कर्ज वृद्धी होऊन शाखेचा एकूण व्यवसाय ५३ कोटींवर पोहोचला. या उद्दिष्टपूर्तीसाठी शाखेतील सर्व सेवकांनी हिरीरीने सहभाग घेतला होता.

या कार्यक्रमाचे निमित्ताने साधारण ३५० खातेदारांनी, हितचिंतकांनी शाखेस भेट दिली. रा. स्व. संघ बोरिवली भाग संघचालक मा. राजाभाऊ भांगेजी, गोरेगाव विभाग कार्यवाह श्री. विलास भागवत, श्री. दिलीपजी पै, श्री. सुरेंद्र थत्ते आदी मान्यवर तसेच जनता बँक स्टाफ वेल्फेअर असोसिएशनचे पदाधिकारी, सेवक संचालक श्री. मधुसूदन हर्डीकर, बँकेचे सभासद, खातेदार, हितचिंतक, मुंबईतील सेवक बंधू, सेवकांचे नातेवाईक, बोरीवलीतील इतर शाखांचे शाखाव्यवस्थापक व सेवक इ. उपस्थित होते.

सत्यनारायण महापूजा शाखाव्यवस्थापक श्री. रवींद्र लिमये व त्यांच्या पत्नी सौ. मृणाल लिमये यांचे हस्ते करण्यात आली.

## विलेपार्ले शाखेमध्ये चालू व बचत खाते ठेवींच्या (CASA DEPOSIT) वृद्धीसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा वृत्तांत

आपल्या विलेपार्ले शाखेमध्ये चालू आर्थिक वर्षात CASA DEPOSIT वाढविण्यासंदर्भात मोठे उद्दिष्ट ठेवले आहे. त्या अनुषंगाने शाखास्तरावर सेवक सभा घेऊन सर्व सेवकांना CASA DEPOSIT संदर्भात प्रत्येक महिन्यास प्रत्येकी ३ बचत खाती व २ चालू खाती उघडण्याचे आवाहन करण्यात आले. या बाबतीत ग्राहकांचा सहभाग वाढविण्यासाठी शाखास्तरावर वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले आहेत.

* शाखेतील ग्राहक वर्गामध्ये नवीन पिढी व तरुणांचा समावेश व सहभाग वाढावा या दृष्टीने पार्ले परिसरातील शाळांमध्ये जावून १० वी परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अभिनंदन पत्र देवून चिरंजीव बचत खाते योजनेची माहिती दिली.

* गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने पार्ले परिसरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या काही निवडक मान्यवर व्यक्तिंचे स्नेहमिलन आयोजित करण्यात आले होते.

* खातेदारांनी त्यांच्या कुटुंबातील पुढच्या पिढीतील सदस्यांची तसेच त्यांच्या नातेवाईक व मित्रमंडळी यांची खाती आपल्या बँकेत उघडण्यात यावी असे आवाहन करणारे पत्र खातेदारांना देण्यात आले. त्याचप्रमाणे शाखास्तरावर ''शुभंकर योजना'' या नावाने ''अंगारकी चतुर्थी ते अनंत चतुर्दशी'' या कालावधीसाठी हमेबंद ठेव योजना देण्यात आली असून त्याद्वारे ग्राहकांना आपल्या बँकेकडे खाते उघडण्यास प्रोत्साहीत करण्यात आले.

* महिन्याच्या प्रत्येक शनिवारी शाखेतील एका सेवकामार्फत ग्राहकांसोबत व्यक्तिश: संवाद साधून बचत खाते उघडण्यासंसर्भात प्रयत्न केले जातात. अशाप्रकारे चालू/बचत खाते वाढ अभियाना संदर्भात शाखेत सुरू असलेल्या प्रयत्नांनी एप्रिल ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीत शाखेत ३३९ बचत खाती व १३ चालू ठेव खाती उघडण्यात आलेली आहेत. या योजनेच्या यशस्वितेसाठी मन:पूर्वक काम केलेल्या कर्मचारी वर्गाचे बँकेतर्फे अभिनंदन!

## इंदापूर शाखेमध्ये बचत/चालू ठेव वृद्धी अभियानासाठी विशेष प्रयत्न



शाखाव्यवस्थापक श्री.सीताकांत मेंडजोगी व श्री. जितेंद्र गायकवाड यांनी मे. इंदापूर डेअरी अँण्ड मिल्क प्रोडक्ट्स लि. चे चेअरमन श्री दशरथ तथा दादा माने, संचालक श्री विष्णुकुमार माने यांची भेट घेऊन कंपनीच्या सर्व सेवकांची पगार खाती उघडून त्यांचे पगार शाखेमार्फत करण्याबाबत विनंती केली असता श्री.दादा माने यांनी त्यास तत्काळ मान्यता दिली.

शाखेकडील सेवक श्री. सचिन आंबेकर, श्री. जितेंद्र गायकवाड व श्री. सोमनाथ खरवडे यांनी सर्व सेवकांकडून सेव्हिंग अर्ज भरून सेव्हिंग खाते उघडण्याचे काम पूर्ण केले. एकूण ८०१ नवीन खाती उघडण्यात आली.

या अभियानाअंतर्गत इंदापूर डेअरीशी संलग्न चालू खाती मिळाली आहेत. एटीएम कार्डधारकांची संख्या १८५७ झाली आहे. त्यांना एटीएम कार्ड देण्याचा कार्यक्रम मा. काकतकर साहेब, मा. कामत साहेब आणि मा. म्हसकर साहेब यांच्या उपस्थितीत आणि मा. दादा माने व श्री. काकतकर साहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

याच अभियानाचा भाग म्हणून शाखेमध्ये श्री सत्यनारायण पूजा आयोजित केली होती. कार्यक्रमास मान्यवर व प्रतिष्ठीत नागरीक उपस्थित होते.

कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. सर्व सेवकांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला.

## देवरुख शाखेचे 'चिरंजीव बचत ठेव' योजनेसाठी विशेष प्रयत्न

देवरुख शाखेने नियोजन विभागाच्या सहकार्याने काडसिद्धेश्वर हायस्कूल, पूर ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना वह्या वाटप केले. यावेळी विद्यार्थ्यांना बचतीचे महत्व सांगण्यात आले. जनता बँकेच्या विविध योजना पालकांपर्यंत पोचविण्यात आल्या. कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला. पूर हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. कुसनाळे सर यांनी विद्यार्थ्यांना वह्या देवून मदतीचा हात दिला त्याबद्दल बँकेचे आभार मानले.



**काडसिद्धेश्वर हायस्कूल पूर येथे 'चिरंजीव ठेव' खाते उघडताना मुख्याध्यापक श्री. कुसनाळे व जनता बँकेचे देवरुख शाखा व्यवस्थापक श्री. दांडेकर.**

याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणजे अतिशय दुर्गम भागात, सह्याद्रीच्या पायथ्याशी असणाऱ्या या गावात अतिशय गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा लोकांना बचतीचे महत्त्व व बँकेच्या सेवा या गोष्टी विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या व त्याचाच परिणाम म्हणून या शाळेतून एकाच वेळी २७ चिरंजीव बचत ठेव खाती उघडून घेण्यात आली.

## बाजीराव रोड शाखेकडून बँकेच्या कर्जदार उद्योजकांसाठी कार्यशाळेचे आयोजन

बँकेच्या कर्जदार उद्योजकांसाठी प्रसिद्ध कॉर्पोरेट ट्रेनर श्री. मनोज अंबिके यांच्या कार्यशाळेचे आयोजन मार्केट यार्ड येथील प्रशिक्षण केंद्रात करण्यात आले होते. कार्यक्रमास पुणे शहरातील विविध शाखांकडील एकूण ३३ उद्योजक उपस्थित होते. बँकेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.कुलकर्णी साहेब, मा. संचालक श्री. भावे साहेब व मा. अध्यक्ष श्री. खळदकर साहेब या कार्यक्रमास उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत, प्रास्ताविक व परिचय श्री. नाखरे साहेब, मा. सहाय्यक महाव्यवस्थापक, मुख्य कचेरी कर्ज विभाग यांनी करून दिला. मा. अध्यक्ष खळदकर साहेब यांनी समारोप केला.

## तळेगांव स्टेशन शाखेमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यक्रम

तळेगांव स्टेशन शाखा व ज्येष्ठ सुहृद मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने बँकेच्या एक्झिक्युटर ट्रस्टी विभागातर्फे व्यवस्थापन व मेडिक्लेम पॉलिसी या विषयावर ज्येष्ठांसाठी व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. ज्येष्ठ सुहृद मंडळाचे कोषाध्यक्ष मा. उदय धायगुडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष मा. अरुण रोडे उपस्थित होते. मृत्युपत्र व त्याचे व्यवस्थापन या विषयावर बँकेचे विधान सल्लागार मा. ॲड. संजय अंतरकर यांनी सविस्तर विषय मांडला. त्यांनी मृत्युपत्राविषयी सविस्तर व सोप्या भाषेत छोट्या छोट्या पण गरजेच्या बाबी यांची माहिती दिली तसेच नागरिकांच्या शंकांना समाधानकारक उत्तरे दिली.

ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष मा. अरुण रोडे हे अहमदनगर डिस्ट्रीक्ट बँकेचे जनरल मॅनेजर होते. त्यांनी आपल्या बँकेचे कौतुक करून बँकेची स्थिती अत्यंत चांगली असून, येथे कोणतीही गुंतवणूक ही अत्यंत सुरक्षित असल्याचे सांगितले. तसेच समाजातील वातावरण चांगले राहण्यासाठी मृत्युपत्र आवश्यक आहे. यासाठी बँकेने केलेला उपक्रम उपयुक्त आहे, असेही नमूद केले.

गरूड झेप

गरूड झेप ही गृहपत्रिका केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही.
गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)